28 NOV 2021
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या रुंदावल्या कक्षा!

## ३४ देशांच्या विद्यार्थ्यांचा समावेश; इराकचे सर्वाधिक १९ जण

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठाच्या कक्षा आता सातासमुद्रापार रुंदावल्या आहेत. वेगवेगळ्या ३४ देशांच्या विद्यार्थ्यांनी पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम व पीएच.डी.साठी प्रवेश घेतला आहे. यामुळे 'आंतरराष्ट्रीय विद्यापीठ' अशी विद्यापीठाची ओळख होत आहे.

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हा विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आहे. २७६ महाविद्यालयांत सुमारे २ लाख ५० हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यापीठात आंतरराष्ट्रीय अफेअर्स सेलची स्थापना करण्यात आली आहे. नॅकचे मूल्यांकन, दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण, तज्ज्ञ प्राध्यापक, संशोधन कार्य, निधीची उपलब्धता, परदेशी विद्यापीठाशी केलेले सामंजस्य करार यामुळे अनेक परदेशी विद्यार्थी विद्यापीठाकडे आकर्षित झाले आहेत. गेल्या वर्षी ५६ परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत होते.

२०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी ३४ देशांतील ६५० हून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यामधील ३५० जणांना विद्यापीठाकडून पत्र पाठविण्यात आले होते. मात्र, आफगाणिस्तानमध्ये सत्तांतर होऊन तालिबान राजवट आल्याने अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी येता आले नाही. सध्या विद्यापीठात ३४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यात इराकचे सर्वाधिक १९ विद्यार्थी आहेत. इराण, बांगला देश, नेपाळ, इथोपिया, बोस्टानिया, केनिया, टांझानिया, मोझांबिक, झिम्बाब्वे, सीरिया देशातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

> कोरोनाचे संकट व अफगाणिस्तान सत्ताबदलामुळे बरेचसे परदेशी विद्यार्थी शिक्षणासाठी येऊ शकले नाहीत. पीएच.डी.साठी परदेशी विद्यार्थी घेण्यावर मर्यादा आहेत. परदेशी विद्यार्थ्यांना विविध सवलती, सुविधा देण्यात येत असून त्यांच्यासाठी वसतिगृह उभारले आहे. परदेशी विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी स्वतंत्र विभाग सुरू करण्यात आला आहे. पुढील वर्षी परदेशी विद्यार्थी संख्या वाढेल.
>
> **– प्रा. डॉ. अनिल घुले,**
> संचालक, इंटरनॅशनल अफेअर्स सेल

### बालमानसशास्त्र, वाणिज्य शाखेतून दोघांची पीएच.डी. पूर्ण

विद्यापीठात पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिक्षण घेणारे २४ व पदवीचे ६ विद्यार्थी आहेत. परदेशी विद्यार्थ्यांच्या निवासासाठी विद्यापीठात स्वतंत्र वसतिगृह असून १८ विद्यार्थी प्रवेशित आहेत. पीएच.डी.चा १९ विद्यार्थी अभ्यास करीत आहेत. इराणचा वर्धा मोखलेशी हा पहिला परदेशी पीएचडीधारक विद्यार्थी आहे. त्याने बालमानसशास्त्र विषयातून पीएच.डी. संपादन केली. बांगलादेशच्या लिटॉन मोहाले याने वाणिज्य आणि व्यवस्थापन विषयातून पीएच.डी. पूर्ण केली आहे.

तरुण भारत

# हिवाळी सत्रातील परीक्षा विलंब शुल्कामध्ये १०० टक्के सवलत

**प्रतिनिधी**
कोल्हापूर



- विलंब, अतिविलंब शुल्क माफ
- शिवाजी विद्यापीठ प्रशासनाचा निर्णय

शिवाजी विद्यापीठातंर्गत या शैक्षणिक वर्षात ऑक्टोबर, नोव्हेंबरमधील परीक्षांच्या विलंब आणि अतिविलंब शुल्कांत १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे. केवळ परीक्षा शुल्क घेताना विलंब, अतिविलंब शुल्क माफ केल्याची माहिती परीक्षा आणि मुल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठांतर्गत २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये हिवाळी सत्रातील परीक्षांसाठी अर्ज दाखल करण्याच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. त्यानुसार कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालयात, मान्यताप्राप्त संस्था, विद्यापीठ अधिविभाग स्तरावर विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही सुरू आहे. दरम्यान कोरोनामुळे विद्यार्थ्यांना होणारा आर्थिक त्रास कमी करण्यासाठी हिवाळी सत्रातील परीक्षांच्या विलंब, अतिविलंब शुल्कात १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार महाविद्यालयांनी परीक्षा शुल्कासोबत कोणत्याही विद्यार्थ्यांकडून विलंब, अतिविलंब शुल्क घेऊ नये, अशा सूचना केल्या आहेत.

विद्यार्थ्यांना परीक्षांसाठी विलंब, अतिविलंब शुल्क १०० टक्के माफ केले आहे. त्यामुळे परीक्षा शुल्क घेऊन विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरून घ्यावेत, असे प्रभारी संचालक पळसे यांनी महाविद्यालयांना सुचित केले आहे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ परीक्षांच्या विलंब शुल्कात सवलत

कोल्हापूर : कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या आर्थिक स्थितीचा विचार करून शिवाजी विद्यापीठाने हिवाळी सत्रातील परीक्षांच्या विलंब, अतिविलंब शुल्कात शंभर टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर या हिवाळी सत्रातील परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यानुसार महाविद्यालय, संस्था, विद्यापीठातील अधिविभागांनी परीक्षा शुल्कासोबत कोणत्याही विद्यार्थ्यांकडून विलंब अथवा अतिविलंब शुल्क स्वीकारण्यात येऊ नये, अशी सूचना परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी परिपत्रकाद्वारे शुक्रवारी केली.

पुढारी

# विद्यापीठात मंगळवारी रक्तदान शिबिर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग आणि विवेकानंद केंद्र-कन्याकुमारी शाखा, कोल्हापूर यांच्या वतीने मंगळवारी (दि. ३०) सकाळी १० ते २ या वेळेत राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृह (लोककला केंद्र) येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. रक्तदान शिबिरात विद्यार्थी, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले आहे.

28 NOV 2021 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd-1962

NAAC 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

## ५८ वा वार्षिक दीक्षांत समारंभ

## विद्यार्थ्यांसाठी निवेदन

- विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत समारंभ साधारणपणे जानेवारी/फेब्रुवारी, २०२२ दरम्यान नियोजित आहे.
- ऑक्टोबर, २०२० व एप्रिल, २०२१ सत्रातील आणि यापूर्वीच्या अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनी पदवी/पदविका, प्रमाणपत्र मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन पध्दतीने खाली दर्शविलेल्या मुदतीमध्ये विहित नमुन्यासह पदवी प्रमाणपत्र मागणीकरिता दीक्षांत अर्ज करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| १) दि. २९ नोव्हेंबर, २०२१ ते दि. १८ डिसेंबर, २०२१ पर्यंत शुल्क | रु. २५०/- |
| २) दि. १९ डिसेंबर, २०२१ ते दि. २३ डिसेंबर, २०२१ पर्यंत शुल्क | रु. ३५०/- |
| ३) दि. २४ डिसेंबर, २०२१ ते दि. २८ डिसेंबर, २०२१ पर्यंत शुल्क | रु. ८५०/- |
| ४) पीएच.डी. प्राप्त विद्यार्थ्यांचे दीक्षांत अर्ज दि. ०५ जानेवारी, २०२२ पर्यंत रु. ८५०/- शुल्काने स्वीकारले जातील. | |

- ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज **Regular** व **Autonomus** ऑप्शनमधून भरले आहेत त्या विद्यार्थ्यांनी अर्जाची प्रिंट विद्यापीठात जमा करण्याची आवश्यकता नाही. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत स्वत:च्या माहितीसाठी जपून ठेवावी.
- सर्व बी.कॉम., बी.एड. व विधीशाखा (लॉ) परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी (**PRN** असणारे विद्यार्थी) संगणक प्रणालीमधून अर्ज भरताना आपला मुख्य विषय (**Specialization**) काळजीपूर्वक बिनचूक भरावा, यात चूक झाल्यास त्याची जबाबदारी संबंधितांची राहील.
- सन २००२ पूर्वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी (**Manual option**) तसेच एम.फिल/पीएच.डी विदयार्थी, व श्रेणीसुधार (**Improvement**) विद्यार्थी यांनी ऑनलाईन अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे सुस्पष्ट अपलोड करावीत.
- ऑनलाईन अर्ज करताना उपलब्ध माहितीमध्ये काही तक्रार किंवा दुरुस्ती असल्यास, विद्यार्थ्यांने त्याच्या **Log in** मधील **Grievence** ऑप्शनद्वारे नोंदवावी अपुऱ्या अर्जाची कोणत्याही प्रकारची दखल घेतली जाणार नाही व त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. दीक्षांत समारंभ आयोजनाची तारीख यथावकाश कळविणेत येईल.
- ५८ व्या दीक्षांत समारंभाच्या अनुषंगाने पदवी प्रमाणपत्र मागणी अर्जाबाबतचे सविस्तर निवेदन **www.unishivaji.ac.in/Web Apps (Regular Convocation)** या विद्यापीठ संकेतस्थळावर ठेवण्यात आले आहे.

श्री. गजानन पळसे

प्र.संचालक

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दीक्षांत विभाग

दि. : २८ नोव्हेंबर २०२१